**MHSN020002661996**

## <u>अंतिम हुकूमनामा क्र.०८/२०११ मधील</u>

## <u>नि. क्र.८८ खालील आदेश</u>

प्रस्तुत अर्ज गैरअर्जदाराने म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी सादर केलेला आहे.

२. गैरअर्जदाराने असे कथन केले आहे की, तो आजारी होता व त्याची ॲन्जीओप्लास्टी झालेली आहे. म्हणून तो न्यायालयात हजर राहून न्यायालयीन आयुक्त नेमणुकीच्या अर्जास म्हणणे देऊ शकला नाही. म्हणून त्याने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. अर्जदारांनी म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध केला आहे. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, दिनांक ११/०७/२०२५ रोजी विना म्हणण्याचा आदेश झालेला असून अर्ज नि.क्र.८४ युक्तीवादासाठी ठेवण्यात आलेला आहे. गैरअर्जदार जाणीवपूर्वक प्रकरण लांबविण्याचा प्रयत्न करित आहे. म्हणून त्यांनी अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली.

४. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. उभयपक्षाचा युक्तिवाद ऐकला. गैरअर्जदाराने असे कथन केले आहे की, तो आजारी होता व त्याची ॲन्जीओप्लास्टी झालेली आहे. म्हणून तो न्यायालयात हजर राहून न्यायालयीन आयुक्त नेमणुकीच्या अर्जास म्हणणे देऊ शकला नाही. गैरअर्जदाराचे कथनास त्याचे शपथपत्र पुष्टी देणारे

आहे. प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता गैरअर्जदाराचे हक्क अबाधीत ठेवण्याकरीता तसेच अर्ज नि.क्र.८४ गुणवत्तेवर निकाली काढणेकरीता न्यायाचे दृष्टीने त्याला म्हणणे दाखल करणेस परवानगी देणे उचित होईल. परंतु प्रकरण प्रलंबित राहिल्याने अर्जदार व न्यायालयाचा वेळ खर्च झालेला आहे. म्हणून अर्जदारांना रु.५,००/–खर्च व जिल्हाविधी प्राधिकरणास रु.५,००/– खर्च जमा करणेच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

SHAKTI UTTAMRAO DESHMUKH

Digitally signed by SHAKTI UTTAMRAO DESHMUKH
Date: 2025.11.25 12:55:35 +0530

सांगली. (श. उ. देशमुख)

दि.२४/११/२०२५ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सांगली

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ***K. U. Nadaf*** |
| Court | : | Civil Judge Sr.Dn., Sangli. |
| Date of order/judgment | : | 24.11.2025 |
| Signed by the Presiding Officer on | : | 24.11.2025 |
| Uploaded on | : | 25.11.2025 |